महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ अंमलबजावणीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक, क्र. आरटीएस-२०२३/प्र.क्र.७७/लो.दि.कक्ष**
मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २१ नोव्हेंबर,२०२३

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र राज्यामध्ये नागरीकांना राज्य शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सर्व सेवा पारदर्शक, गतिमान व कालबध्द पध्दतीने उपलब्ध करुन देण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ दिनांक २८ एप्रिल,२०१५ पासून पारित करण्यात आला आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली नियमावली दिनांक १६ नोव्हेंबर,२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम ३(१) अनुसार सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्याकडून पुरविण्यात येणा-या लोकसेवांची सूची, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी व द्वितीय अपिलीय प्राधिकारी यांची नावे, नमुना किंवा कोणतेही शुल्क असल्यास ते शुल्क, याबाबतची माहिती त्यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर, किंवा शासनाचे किंवा विभागाचे अथवा कार्यालयाचे पोर्टल असल्यास त्यावर प्रदर्शित करेल अशी तरतूद करण्यात आली आहे. या माहितीसोबतच, सार्वजनिक प्राधिकरणांनी संबंधित राज्य सेवा हक्क आयुक्तांचा ई-मेल, दूरध्वनी क्रमांक व तृतीय अपिलाची तरतूद या बाबी सुध्दा कार्यालयाच्या सूचना फलकावर, किंवा शासनाचे किंवा विभागाचे अथवा कार्यालयाचे पोर्टल असल्यास त्यावर प्रदर्शित करावी.

३. त्याचप्रमाणे, सार्वजनिक प्राधिकरण पुरवित असलेल्या सेवापैंकी ज्या सेवा अद्याप महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ खाली अधिसूचित केल्या नसतील, अशा सेवा अधिसूचित करण्याबाबत आयोग विभागाच्या प्रभारी प्रशासकीय सचिवांबरोबर विचारविनिमय करुन या सेवा अधिसूचित करण्याबाबत शासनास शिफारस करेल.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२३११२११६३८४४०००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ROSHANI DINESH KADAM PATIL

Digitally signed by ROSHANI DINESH KADAM PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=685cbbb5899027ea29d44ae02d12f2c1313143ad8376755d0e815a1eb20fd0ce, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=16D26A3CE7C86CC341C246E6BB468A80B20659CCB13144AF609F03226E90BA0C, cn=ROSHANI DINESH KADAM PATIL
Date: 2023.11.21 16:39:12 +05'30'

( रोशनी कदम-पाटील )
उप सचिव,महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे प्रधान सचिव,
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,

४) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,

५) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

६) सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.

७) मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,

८) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,

९) महासंचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मुंबई.

१०) महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई.

११) सर्व विभागीय आयुक्त,

१२) मुख्य आयुक्त,राज्य सेवा हक्क आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.

१३) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन,मुंबई.

१४) सर्व जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त,

१५) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख,

१६) प्रादेशिक प्रमुख/कार्यालय प्रमुख,

१७) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,

१८) निवड नस्ती ( लोकशाही दिन कक्ष) सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई.